# ‘सिडको तारा’ रोजगार मेळाव्यात

# ५१ प्रकल्पबाधीतांना नोकरी

**बेलापूर :** `सिडको तारा`मार्फत नवी मुंबईतील प्रकल्पबाधीत युवक-युवतींसाठी आयोजीत करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यामध्ये ५१ जणांना नोकरी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

रविवार दिनांक १७ जानेवारी २०१६ रोजी बेलापूर रेल्वे स्टेशन येथील सिडको प्रशिक्षण केंद्रामध्ये या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.




‘सिडको तारा’ मार्फत आयोजित या रोजगार मेळाव्यामध्ये १८ कंपनी सहभागी झाल्या होत्या. मेळाव्यासाठी दहावी तसेच बारावी उत्तीर्ण, पदवी तसेच पदव्युत्तर पदवी घेतलेल्या ३०६ उमेदवारांनी नावनोंदणी केली होती. त्यापैकी मेळाव्यासाठी १७३ उमेदवार उपस्थित होते. त्यामध्ये १४२ प्रकल्पग्रस्त आणि ३१ बिगर प्रकल्पग्रस्त उमेदवार होते. मेळाव्यामध्ये एकूण २६६ मुलाखती घेण्यात आल्या. त्यापैकी ५१ उमेदवारांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त इतर ६६ उमेदवारांची पुढील मुलाखतीसाठी निवड करण्यात आली आहे.





रोजगार मेळाव्यासाठी बिपीओ, रिटेल, टोल, आयटी/ आयटीईएस, ऑटोमोबाईल, कन्सल्टंसी आणि विपणन क्षेत्रातील कंपन्या सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये क्रोमा, आयटीएम, एमइपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रायव्हेट लि., सिएमएस इन्फो सिस्टम्स लि., वास्ता असोसिएट, इन्फो वर्ल्ड, बीटा ग्रीडीरॉन, आयडीयल मॅन पॉवर सोल्युशन, एस के व्हील्स, बिजनेस इन्फॉर्मेशन सिस्टम्स, फॉगर्स इंडिया, वन पॉइंट वन सोल्युशन, मॅजिक वेब सर्व्हीसेस, टीम ९ आणि हिंदुजा ग्लोबल सर्व्हीसेस आदी कंपन्या सहभागी झाल्या होत्या. या कंपन्यांमध्ये ८ हजार ते २५ हजार रुपयांपर्यंतची नोकरी उपलब्ध आहे.

| एकूण उमेदवार | घेण्यात आलेल्या एकूण मुलाखती | निवड झालेल्या उमेद | त्या व्यतिरिक्त पुढील मुलाखतीसाठी निवडलेले | एकूण कंपनी |
|---|---|---|---|---|
| १७३ | २६६ | ५१ | ६६ | १८ |

या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सिडकोचे व्यवस्थापक (पुनर्वसन) कृष्णा कणसे, कार्यक्रम व्यवस्थापक मेधा जोशी, प्रकल्प सल्लागार सी. के पाटील, प्रशिक्षण केंद्र समन्वयक सुहास जोशी, तसेच आयएल ॲन्ड एफएस संस्थेचे गिरीष कामत आणि त्यांचे सहकारी प्रयत्नशील होते. नवी मुंबईतील प्रकल्पबाधीत तरूण-तरूणींना सिडको ताराच्या माध्यमातून कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण तसेच नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिले जात आहेत.

-----